विजयकुमार बदनापूरकर

५

# भगवंताचे तत्वज्ञान - लोकशाही

तथागत गौतम बुध्दांनी अडीच हजार वर्षापूर्वी बौध्द धम्माची स्थापना केली. धम्म वाढीसाठी प्रचार-प्रसार करण्याची जबाबदारी भिक्षू संधावर टाकली. ज्यावेळी एखाद्यावर जबाबदारी टाकली जाते अर्थातच त्याला काही अधिकार ही दिले जातात आणि हे अधिकार नियंत्रित करण्यासाठी एक व्यवस्था असते आणि ती व्यवस्था म्हणजे लोकशाही होय. भिक्षू संघातील लोकशाही ही जगातील पहिली लोकशाही मानली जाते. जगातील कोणत्याही देशातील लोकशाहीचा मूलाधार बौध्द भिक्शू संघातील व्यवस्थाच आहे. अब्राहम लिंकन (अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष)- लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून भगवंतानी सांगितलेली लोकशाही भारतीय जनतेला दिली. त्यांच्या मते- रक्ताचा थेंब ही न सांडता लोकांच्या जीवनात झालेला क्रांतीकारक बदल म्हणजे लोकशाही याचाच अर्थ जनसामान्यांसाठी सभेची सूत्र सांभाळणाऱ्या लोकांचे व्यक्तिमत्व आदर्श असावे. ज्ञानवंत, शीलवंत, करुणाकारी असे व्यक्तिमत्व असणारी खाजगी मालमत्तेचा हव्यास नसणारी आणि मानव कल्याणाचे तत्वज्ञान जोपासणारी व्यक्तीच लोकशाहीची धुरा सांभाळू शकते. मानवाचे कल्याण हा भगवंताच्या तत्वज्ञानाचा गाभा आहे. मानव समाजाला कोणत्याही भया पासून मुक्त करुन समतावादी व्यवस्थेच्या दिशेने घेऊन जाणे हे तथागतांच्या भारतीय तत्वज्ञानाचे सार आहे. भारतीय लोकशाही ही "बहुजन हिताय बहुजन सुखाय" या तत्वावर आधारलेले आहे.

भगवान बुध्दाच्या शासनात भिक्षू-भिक्षणी एक वर्ग ,उपासक-उपासिका दुसरा वर्ग यामध्ये विभागलेला आहे. भिक्षू-भिक्षणी संघ हा समाजाचा आदर्शभूत संघ आहे. भिक्षू संघ समाजाची सेवा करणारा सेवक आहे. त्यांचे जीवन आदर्शभूत असावे यासाठी बुध्दाने भिक्षूसाठी विनयपिटकामध्ये विनय सांगितलेले आहे. उदा. पौर्णिमेच्या दिवशी सर्वांनी एकत्र यावे आणि पुढील कार्यक्रमाची दिशा ठरवावी. त्यातील एकजण भिक्षू संघाला विचारतो आणि मग त्या परिषदेत एक मुख्य भिक्षूची निवड केली जाते. उत्तर देण्यासाठी त्या भिक्षूला संघाची परवानगी घ्यावी लागते. झो काही नियम ठरणार आहे त्यावर वैचारिक चर्चा होईन बहुमताने निर्णय घेतला जातो. शभेमध्ये

१) ज्ञाप्ती (सूचना मांडणे)- संघाने माझे ऐकावे जर संघाला पसंत असेल तर संघाने कुणालाही प्रबंधक म्हणून निवडावे.

२) अनुश्रावण- संघाने माझे ऐकावे. ज्या उद्देशासाठी निवडत आहे, ज्यांना मान्य आहे त्यांनी गप्प रहावे ज्यांना मान्य नसेल त्यांनी बोलावे.

३) धारणा- संघाने सेवेधिताल निवडले आहे. संघाला पसंत आहे म्हणून संघ मौन आहे. अशी भगवंतानी स्थापित केलेली निवड पध्दती होती. आज देखील विधेयकाचे पहिले वाचन, दुसरे वाचन आणि तिसरे वाचन सभागृहात मान्य होते.